(In Camera) निशाणी क्र.१९

**<u>अर्जदाराचा उर्वरित उलटतपास जाबदेणार क्र.१ ते ५ तर्फे वकील श्री. ए.एस.धारुरकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु-</u>**

२२. हे खरे नाही की, दि.१२/०५/२०२३ रोजीच्या घटनेनंतर देखील जाबदेणार यांनी मला नांदायला नेण्याचा प्रयत्न केला परंतु मी त्याला नकार दिला. मी लग्नानंतर माझ्या सासरच्या लोकांसोबत दोन नातेवाईकांच्या लग्नाला गेले होते. हे खरे नाही की, मी व माझे पती बारामती येथील अनेक ठिकाणी फिरायला गेलो. मी सासरच्या लोकांसोबत एकदा महाबळेश्वरला गेले होते. हे खरे की, आम्ही त्या सहलीला सगळ्यांच्या विचाराने गोडी-गुलाबीने गेलो. हे खरे नाही की, माझ्या सासरचे लोक मला घरातील एक व्यक्ती म्हणुन चांगली वागणुक देऊन नेत होते. मी सहलीला माझ्या मर्जीने गेले पण लग्नाला माझ्या मर्जीने गेले नव्हते. मी सहलीला व लग्नाला गेल्यावर आमच्या कुटुंबाचे एकत्र फोटो काढले होते. हे खरे की, ते फोटो माझ्या मर्जीने काढले गेले. हे खरे नाही की, ते फोटो पाहुन आमचे कुटुंब आनंदी आहे असे वाटते. साक्षीदार सांगते तसे दुसऱ्याला वाटते पण मला वाटत नाही. हे खरे नाही की, फोटोवरुन मला चांगल्या प्रकारे नांदविले असे दिसते.

२३. मी नांदायला नेण्याबाबत कोणत्याही न्यायालयात अर्ज दाखल केला नाही. हे खरे नाही की, मला नांदायला जायची इच्छा नसल्याने मी तसा अर्ज केला नाही. हे खरे नाही की, माझ्या सासरी माझा कोणताही मानसिक व शारिरीक छळ झाला नाही. हे खरे नाही की, मी जाबदेणार यांचा शारिरीक व मानसिक छळ केला आहे. हे खरे नाही की, मी स्वतः जाबदेणार यांचा त्याग करत माझ्या इच्छेने माहेरी राहते. हे खरे की, माझे पती घरातील कर्ते पुरुष असुन घर त्यांच्यावर चालते. हे खरे नाही की, माझ्या सासुच्या आजारपणाचा खर्च केवळ माझे पती करतात. माझ्या दीराचे उत्पन्नाचे साधन दाखविणारा पुरावा न्यायालयात दाखल केलेला नाही. हे खरे की, माझे सासरे घरी असतात. हे खरे नाही की, माझ्या दीराच्या व नणंदेच्या शिक्षणाचा खर्च हा माझ्या पतीने केला. माझ्या नणंदेच्या उत्पन्नाबाबतचा पुरावा मी न्यायालयात दाखल केलेला नाही. हे खरे नाही की, माझ्या नणंदेच्या लग्नाचा खर्च माझ्या पतीने केला. हे खरे नाही की, माझ्या सासरी कमावते केवळ माझे पती असुन तेच सर्व आर्थिक व्यवहार करतात.

**२४.** हे खरे नाही की, माझा भाऊ खाजगी कंपनीत कामाला जातो. हे खरे नाही की, मी नोकरी करतो. मी अर्ज दाखल केला कारण मला शारिरीक व मानसिक त्रास होता. माझे वडिल आजरोजी माझा चांगला सांभाळ करतात. मी आजरोजी वडिलांच्या घरी राहते. मी मोबाईल वापरत नाही. हे खरे नाही की, सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे खरे नाही की, मी जाबदेणार यांच्याकडुन नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाही. हे खरे नाही की, मी वडिलांकडे राहत असल्याने मला निवाऱ्याची आवश्यकता नाही. हे खरे नाही की, मी कमावती असल्याने मला पोटगीची आवश्यकता नाही. हे खरे नाही की, विनंती कलमातील सर्व मागणी बेकायदेशीर आहे. हे खरे नाही की, मला पोटगी देण्याची जाबदेणाराची ऐपत नाही. मी अन्य कोणताही साक्षीदार तपासणार नाही. मी या घटनेची साक्षीदार असल्याने अन्य कोणाला तपासायचे नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.05.03 17:17:02 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि.०३/०५/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**